**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड**
**सभावृत्तांत**
**कार्यपत्रिका क्र. ११**

**दिनांक :- १०/२/२०१०** **वेळ :- दु. १२.१५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि. १०/२/२०१० रोजी दु. १२.१५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत बैठकीस खालील प्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. तिकोने हरिभाऊ किसन | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. पिल्ले रामकृष्ण गोविंदस्वामी | सदस्य |
| ३. | मा. श्रीम. कदम निर्मला सदगुरु | सदस्या |
| ४. | मा. श्रीम. गुंजेकर स्मिता रमेश | सदस्या |
| ५. | मा. श्री. भोंडवे गणेश तुकाराम | सदस्य |
| ६. | मा. श्री. साळुंके राजेंद्र गुलाबराव | सदस्य |
| ७. | मा. श्री. वाघ रघुनाथ दलपत | सदस्य |
| ८. | मा. श्रीम. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | सदस्या |
| ९. | मा. श्री. बाराहाते शरद भगवंतराव | सदस्य |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभाग अधिकारी - डी. के. गावडे, मा. कार्यकारी अभियंता - श्री. मकरंद निकम, श्री. रामदास जाधव, प्रशासन अधिकारी - श्री. आर.एम. कोंढाळकर, सहा. आरोग्याधिकारी - श्री. बी.एस. नामपूरकर, लेखाधिकारी- श्री. पी.सी. कांबळे, उपअभियंता - श्री. एफ.बी. शेख, श्री. आर.एस. पवार, श्री. डी.एस. भोईटे, श्रीम. एल.एस. बाबर, श्री. मनोज सेठिया, श्री. प्रवीण घोडे, श्री. पी.आर. काळुस्कर, श्री. एम.डी. पाटोदकर, श्री. वाघुंडे एस.एन., कनिष्ठ अभियंता - श्री.निंबाळकर आर.आर., श्री. एम.एस. राऊत, श्री. गुरव एस.सी.

सर्व प्रथम मा. अध्यक्ष हरिभाऊ किसन तिकोने यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली. विषयपत्रिकेवर एक विषय असल्याने मा. अध्यक्ष यांचे परवानगीने खालील विषय ऐन वेळचे विषय म्हणून सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्र. २** **विभाग :- लेखा, ब प्रभाग**

सन २००९-१० चे सुधारीत व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रक ब प्रभाग समितीपुढे अवलोकनार्थ ठेवणे.

**विषय क्र. ३** **विभाग :- स्थापत्य, ब प्रभाग**

चिंचवड वॉर्ड क्र. ६४ मधील आरक्षण क्र. २२६ येथे सिमाभिंत बांधणे व आरोग्य कार्यालय बांधणे कामातून इतर कामे करणे.

**विषय क्र. ४** **विभाग :- मा. सदस्यांचा प्रस्ताव**

ब प्रभाग समितीची स्थापना होऊन तीन वर्षे होत आलेले आहे. अद्यापपर्यंत नगरसदस्यांचा अभ्यास दौरा झालेला नाही. इतर शहरातील महापालिकेचे कामकाजाची पध्दत माहित करुन घेणे आवश्यक आहे. इतर महापालिकेच्या कामकाजाचा अनुभव आपल्या महापालिकेस उपयुक्त ठरणार असल्याने ब प्रभाग समितीचा जयपूर या शहरामध्ये अभ्यास दौरा काढणेत यावा.

**विषय क्र. ५** **विभाग :- मा. सदस्यांचा प्रस्ताव**

विषय :- वॉर्ड क्र. ६४ गावठाण स.नं. ५९६ मधील खोकलाई देवी ग्रामदेवस्थान पाराचे रुंदीकरणात वगळणेबाबत

वॉर्ड क्र. ६४ चिंचवड गावठाण स.नं. ५९६ मधील मंजुर विकास योजनेप्रमाणे रस्ता रुंदीकरण प्रस्तावित आहे. सदर रस्ता रुंदीकरणामध्ये चिंचवड गावातील जागृत खोकलाई देवी मंदिर ग्रामदेवस्थान येत आहे. खोकलादेवी ही जागृत पुरातन मंदीर असल्याने भाविकांच्या भावनेशी निगडीत आहे. सदर मंदिराची पूजाअर्चा येथील रहिवाशी श्री. सोमनाथ दशरथ तिकोने हे व त्यांच्या मागील तीन पिढयांपासून पुर्वापार करीत आहेत. या ठिकाणी गावातील महिला वटसावित्री पौर्णिमाचे धार्मिक व इतर सांस्कृतिक कार्यक्रम, उत्सव ठिकठिकाणी वारंवार होत असतात. तेथे पुरातन वटवृक्ष , लिंबाचे झाड, जांभळाचे झाड अशा प्रकारचे अनेक झाडे त्या पाराच्या भोवतीने लावणेत आले आहेत.

स.नं. ५९६ मधील हा भाग चिंचवड गावातील गावठाणाचा भाग आहे. सदर भोकलाई देवी ग्राम देवस्थान आहे. सदर पारामळे रहदारीस कोणत्याही प्रकारे अडचण होत नाही. तसेच मंदिराच्या पारावरील झाडामुळे सदर चौकात शोभा होते. तसेच चिंचवड गावठाणातील इतर मंदिराचे व धार्मिक स्थळांच्या बाबतीत मंदिर / पारांचा भाग वगळून ज्या प्रमाणे रस्ता रुंदीकरण करण्यात आले आहे त्याप्रमाणे गावातील नागरिकांचा / ग्रामस्थांचा धार्मिक भावनांचा विचार करुन खोकलाई देवी ग्रामदेवस्थान पाराचे रस्ता रुंदीकरण रद्द करुन पाराच्या मागील बाजुने सर्व्हे नं. ५९३/१, ५९४, ५९५ व ५९६ मधील जो पुर्वापार रस्ता होता. त्या रस्त्यावरील झालेले अतिक्रमण काढून टाकण्यात येऊन तेथे रस्ता रुंदीकरण करण्याची कार्यवाही म.प्रा. नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही ठेवून शासनास मान्यतेसाठी सादर करणेकरीता ठराव ब प्रभाग समिती मार्फत मा. महापालिका सभेपुढे मान्यतेकामी ठेवण्यात यावा.

**विषय क्र. ६ विभाग :- पाणीपुरवठा**

ब प्रभागांतर्गत ठिकठिकाणी वॉशआऊट बसविणे व एअरवॉल्ह बदलणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. ९,९५,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देणे.

**विषय क्र. ७ विभाग :- पाणीपुरवठा**

ब प्रभागांतर्गत मनपा परिसरातील थेट नळाला लावलेल्या विद्युत मोटारी व अनधिकृत नळ कनेक्शन तोडणेचे काम ठेकेदार पध्दतीने करणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. ९,५०,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देणे.

**विषय क्र. ८ विभाग :- पाणीपुरवठा**

ब प्रभागांतर्गत चिंचवडगांव वॉर्ड क्र. ६४ मधील पाणीपुरठा वितरण व्यवस्थेतील लिकेजेस काढणे व किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. ९,९५,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देणे.

**विषय क्र. ९ विभाग :- पाणीपुरवठा**

ब प्रभागातील प्रभाग क्र. ५९, ६०, ६४, ६५, ६६ या भागात खाजगी टँकरमार्फत पाणीपुरवठा करणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. ९,९५,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देणे.

**विषय क्र. १० विभाग :- पाणीपुरवठा**

ब प्रभागांतर्गत चिंचवडेनगर, बिजलीनगर इ. परिसरात पाणीपुरठा वितरण व्यवस्थेमधील किरकोळ देखभाल दुरुस्तीची कामे करणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. ९,७५,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देणे.

**विषय क्र. ११ विभाग :- सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव**

चिंचवड मधील श्रीमान महासाधू मोरया गोसावी क्रिडांगण येथील इमारतीचे जिन्यामध्ये लोखंडी जाळीचे ग्रील बसविणेबाबत.

**विषय क्र. १२ विभाग :- सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव**

अजमेरा वॉर्ड क्र. २९ येथील मोकळया जागेत, सांस्कृतिक केंद्र बांधणचे कामाकरीता सन २०१०-११ च्या अंदाजपत्रकात वाढीव तरतुद करणे.

**विषय क्र. १३ विभाग :- सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव**

प्र.क्र. ५८ रावेत पुनावळे मधील खाली नमुद केलेल्या कामकाजासाठी सन २०१०-११ च्या अंदाजपत्रकात वाढीव तरतुद करणे.

१. रस्ते खडीमुरुमाचे करणे.
२. रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे.
३. गटर्स करणे
४. मौजे रावेत येथे बेंगलोर मुंबई बाहयवळण मार्गावर उड्डाण पुल / भुयारी मार्ग बांधणे.

**विषय क्र. १४ विभाग :- सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव**

प्र.क्र. ५९ वाल्हेकरवाडी मध्ये खाली नमुद केलेल्या विदयुत विषयक कामकाजासाठी सन २०१०-११ च्या अंदाजपत्रकात वाढीव तरतुद करणे.

१. बिजलीनगर येथील आर.एस. सेंटर पासून ते आहेरनगर भागात इमारती जवळून जाणारे धोकादायक उच्चदाब वाहीनी हलविणे.
२. स्वप्ननगरी, प्रेरणा शाळा इ. ठिकाणी म.रा.वि.वि. कं. चे लघुदाब व उच्चदाब वाहीनीचे पोल व तारा हलविणे.
३. बिजलीनगर पाण्याच्या टाकी मागील परिसरामधील रस्ता रुंदीकरणात अडथळा निर्माण करणारे म.रा.वि.वि. कं. चे लघुदाब व उच्चदाब वाहीनीचे पोल व तारा हलविणे.
४. वाल्हेकरवाडीमधील सो.व्हे. दिव्यांचे नुतनीकरण करणे व आवश्यक त्या ठिकाणी सो. व्हे. दिवे बसविणे व रोहीत्र संच बसविणे.

**विषय क्र. १५ विभाग :- सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव**

प्र.क्र. ५९ वाल्हेकरवाडी , सायली कॉम्प्लेक्स, गुरुद्वारा, आहेरनगर, भोंडवेवस्ती इ. भागात खाली नमुद केलेल्या स्थापत्य विषयक कामकाजासाठी सन २०१०-११ च्या अंदाजपत्रकात वाढीव तरतुद करणे.

१. पवना नदीकाठी घाट बांधणे.
२. चिंचवड जुना जकातनाका ते वाल्हेकरवाडी पर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करणे व अनुषंगिक कामे करणे.
३. वाल्हेकरवाडी ते रावेत रस्त्यांचे रुंदीकरण करुन डांबरीकरण करणे.
४. आहेरनगर, सायली कॉम्प्लेक्स, चिंचवडे कॉलनी भोंडवेवस्ती परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे.
५. गुरुद्वारा परिसरातील उर्वरित रस्ते डांबरीकरण करणे.
६. विवेकानंद कॉलनी भागातील व इतर परिसरातील रस्ते खडीमुरुमाचे व बी बी एम करणे.
७. गुरुद्वारा परिसरातील रस्त्याचे कडेने पेव्हींग ब्लॉक सरफेस गटर करणे.
८. वाल्हेकरवाडीमधील मोकळया जागा विकसित करणे.
९. वाल्हेकरवडी येथील स्मशानभुमी परिसर विकसित करणे.
१०. वाल्हेकरवाडी परिसरातील रस्त्याचे कडेने पेव्हींग ब्लॉक सरफेस गटर करणे.

तसेच खाली नमुद केलेल्या चालू कामांना सन २०१०-११ च्या अंदाजपत्रकात तरतुद करणे.

१. वाल्हेकरवाडी मधील स्वप्ननगरी सोसा. व चर्च परिसरातील रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे.
२. गुरुद्वारा ते वाल्हेकरवाडी २४ मी. रुंद रस्त्याचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे.

**विषय क्र. १६ विभाग :- सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव**

प्र.क्र. ६० चिंचवडेनगर मध्ये खाली नमुद केलेल्या कामकाजासाठी सन २०१०-११ च्या अंदाजपत्रकात वाढीव तरतुद करणे.

१. थेरगांव पुल ते चिंचवडेनगर कॉर्नर पर्यंतचा डी.पी. नुसार रस्ता करणे.
२. चिंचवडेनगर येथील हॉटेल लोनावळा जंक्शन ते पवनानदीपर्यंत नाला बांधणे.
३. चिंचवडे फॉर्म ते हॉटेल रानमळा पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे.
४. चिंचवडेनगर मधील रस्ते डांबरीकरण करणे.
५. शिवनगरी, बळवंतनगरी मधील रस्ते डांबरीकरण करणे.
६. चिंचवडेनगर मधील शिवतेज कॉलनी व इतर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे.

वरील प्रमाणे ऐन वेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेण्यात आले.

ठराव क्र. १७० विषय क्र. १
दिनांक :- १०/२/२०१० विभाग :- नगररचना व विकास
सुचक :- मा. गणेश भोंडवे अनुमोदक :- मा. राजेंद्र साळुंके

विषय :- मौजे रावेत ता. हवेली येथील मंजुर विकास योजनेतील रावेत गावठाण ते धर्मराज मंगल कार्यालय ते किवळे हद्दीपर्यत १८.०० मी. रस्ता रुंदीखालील जागेचे भूसंपादन करणेबाबत

संदर्भ :- मा. आयुक्त साो. यांचेकडील पत्र क्र. नरवि/कावि/१अ/२३/१० दि. १८/१/२०१०

मा. आयुक्त साो. यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या मंजुर विकास योजनेतील मौजे रावेत ता. हवेली येथील विकास योजनेतील रावेत गावठाण ते धर्मराज मंगल कार्यालय ते किवळे हद्दीपर्यंत १८.०० मी. रस्ता रुंदी या प्रस्तावाने बाधित होणा-या खाजगी मिळकतीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ [२ ] व भूसंपादन कायदा १८९४ चे तरतुदीनुसार भूसंपादन करावे लागेल. या भूसंपादनास व याकामी येणा-या खर्चास [ संबंधित भूमिसंपादन अधिकारी कळवतील ती नुकसान भरपाईची रक्कम ] मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने मा. महापालिका सभेपुढे मान्यतेकामी शिफारस करणेत येत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर झाला.**

ठराव क्र. १७१ विषय क्र. २
दिनांक :- १०/२/२०१० विभाग :- लेखा विभाग
सुचक :- मा. राजेश पिल्ले अनुमोदक :- मा. राजेंद्र साळुंके

संदर्भ :- मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र क्र. बप्र/कावि/०८/३३/१० दि. ८/२/२०१०

मा. प्रभाग अधिकारी, ब प्रभाग यांनी शिफारस केलेप्रमाणे-

सोबत जोडलेल्या प्रपत्र प्रमाणे सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रकाचे अवलोकन होऊन मा. आयुक्त साो. यांचेकडे मान्यतेकामी शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही सुरु करणेत यावी.

**ठराव सर्वानुमते मंजुर झाला.**

ठराव क्र. १७२ विषय क्र. ३
दिनांक :- १०/२/२०१० विभाग :- स्थापत्य ब प्रभाग
सुचक :- मा. आशा सुर्यवंशी अनुमोदक :- मा. शरद बाराहाते

संदर्भ :- मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र क्र. बप्र/७/कावि/१७३/२०१० दि. २/२/२०१०

मा. प्रभाग अधिकारी, ब प्रभाग यांनी शिफारस केलेप्रमाणे-

चिंचवड वॉर्ड क्र. ६४ मधील आरक्षण क्र. २२६ येथे सिमाभिंत बांधणे व आरोग्य कार्यालय बांधणेचे कामाचा कार्यादेश इकडील विभागाकडून ठेकेदार मे. पी. एस. गुजर यांना देणेत आला असून सदरचे कामास त्यांनी सुरुवात केली. परंतु सदर ठिकाणी आरोग्य ऑफिस ऐवजी परिसरातील मुलांना खेळण्यासाठी मैदान करणेबाबत तेथील नागरिकांनी मा. स्थानिक नगरसदस्य यांचेकडे मागणी केली. मा. स्थानिक नगरसदस्य श्री. हरिभाऊ तिकोणे यांनी ही सदर ठिकाणी आरोग्य ऑफिस ऐवजी मुलांना खेळण्यासाठी मैदान करणेबाबत पत्रान्वये मागणी केली आहे.

तरी मा. स्थानिक नगरसदस्य यांची मागणी पाहता आरक्षण क्र. २२६ येथे सिमाभिंत बांधणे व आरोग्य कार्यालय बांधणेचे कामामधून त्याठिकाणी मुलांना खेळण्यासाठी मैदान व इतर कामे करणेचे प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर झाला.**

ठराव क्र. १७३ विषय क्र. ४
दिनांक :- १०/२/२०१० विभाग :- मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :- मा. आशा सुर्यवंशी अनुमोदक :- मा. गणेश भोंडवे

संदर्भ :- सन्मा. नगरसदस्य रघुनाथ वाघ यांचेकडील पत्र दि. १०/२/२०१०

ब प्रभाग समितीची स्थापना होऊन तीन वर्षे होत आलेले आहे. अद्यापपर्यंत नगरसदस्यांचा अभ्यास दौरा झालेला नाही. इतर शहरातील महापालिकेचे कामकाजाची पध्दत माहिती करुन घेणे आवश्यक आहे. इतर महापालिकेच्या कामकाजाचा अनुभव आपल्या महापालिकेस उपयुक्त ठरणार असल्याने ब प्रभाग समितीचा जयपूर या शहरामध्ये अभ्यास दौरा काढणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर झाला.**

ठराव क्र. १७४ विषय क्र. ५
दिनांक :- १०/२/२०१० विभाग :- मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :- मा. रघुनाथ वाघ अनुमोदक :- मा. गणेश भोंडवे

संदर्भ :- मा. हरिभाऊ तिकोने, अध्यक्ष, ब प्रभाग समिती यांचेकडील पत्र दि. १०/२/२०१०

विषय :- वॉर्ड क्र. ६४ गावठाण स.नं. ५९६ मधील खोकलाई देवी ग्रामदेवस्थान पाराचे रुंदीकरणात वगळणेबाबत

वॉर्ड क्र. ६४ चिंचवड गावठाण स.नं. ५९६ मधील मंजुर विकास योजनेप्रमाणे रस्ता रुंदीकरण प्रस्तावित आहे. सदर रस्ता रुंदीकरणामध्ये चिंचवड गावातील जागृत खोकलाई देवी मंदिर ग्रामदेवस्थान येत आहे. खोकलादेवी ही जागृत पुरातन मंदीर असल्याने भाविकांच्या भावनेशी निगडीत आहे. सदर मंदिराची पूजाअर्चा येथील रहिवाशी श्री. सोमनाथ दशरथ तिकोने हे व त्यांच्या मागील तीन पिढयांपासून पुर्वापार करीत आहेत. या ठिकाणी गावातील महिला वटसावित्री पौर्णिमाचे धार्मिक व इतर सांस्कृतिक कार्यक्रम, उत्सव ठिकठिकाणी वारंवार होत असतात. तेथे पुरातन वटवृक्ष , लिंबाचे झाड, जांभळाचे झाड अशा प्रकारचे अनेक झाडे त्या पाराच्या भोवतीने लावणेत आले आहेत.

स.नं. ५९६ मधील हा भाग चिंचवड गावातील गावठाणाचा भाग आहे. सदर खोकलाई देवी ग्राम देवस्थान आहे. सदर पारामळे रहदारीस कोणत्याही प्रकारे अडचण होत नाही. तसेच मंदिराच्या पारावरील झाडामुळे सदर चौकात शोभा होते. तसेच चिंचवड गावठाणातील इतर मंदिराचे व धार्मिक स्थळांच्या बाबतीत मंदिर / पारांचा भाग वगळून ज्या प्रमाणे रस्ता रुंदीकरण करण्यात आले आहे त्याप्रमाणे गावातील नागरिकांचा / ग्रामस्थांचा धार्मिक भावनांचा विचार करुन खोकलाई देवी ग्रामदेवस्थान पाराचे रस्ता रुंदीकरण रद्द करुन पाराच्या मागील बाजुने सर्व्हे नं. ५९३/१, ५९४, ५९५ व ५९६ मधील जो पुर्वापार रस्ता होता. त्या रस्त्यावरील झालेले अतिक्रमण काढून टाकण्यात येऊन तेथे रस्ता रुंदीकरण करण्याची कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक नगरचना व अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही ठेवून शासनास मान्यतेसाठी सादर करणेकरीता नजीकचे मा. महापालिका सभेपुढे मान्यतेकामी शिफारस करणेत येत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर झाला.**

ठराव क्र. १७५ विषय क्र. ६
दिनांक :- १०/२/२०१० विभाग :- पाणीपुरवठा
सुचक :- मा. स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा. निर्मला कदम

संदर्भ :- मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र बप्र/पापु/३९४/१० दि. २०/१/२०१०

मा. प्रभाग अधिकारी, ब प्रभाग यांनी शिफारस केलेप्रमाणे-

ब प्रभागांतर्गत ठिकठिकाणी वॉश्आऊट बसविणे व एअरवॉल्ह बदलणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. ९,९५,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर झाला.**

ठराव क्र. १७६ विषय क्र. ७
दिनांक :- १०/२/२०१० विभाग :- पाणीपुरवठा
सुचक :- मा. शरद बाराहाते अनुमोदक :- मा. रघुनाथ वाघ

संदर्भ :- मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र बप्र/पापु/३९६/१० दि. २०/१/२०१०

मा. प्रभाग अधिकारी, ब प्रभाग यांनी शिफारस केलेप्रमाणे-

ब प्रभागांतर्गत मनपा परिसरातील थेट नळाला लावलेल्या विद्युत मोटारी व अनधिकृत नळ कनेक्शन तोडणेचे काम ठेकेदार पध्दतीने करणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. ९,५०,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर झाला.**

ठराव क्र. १७७ विषय क्र. ८
दिनांक :- १०/२/२०१० विभाग :- पाणीपुरवठा
सुचक :- मा. शरद बाराहाते अनुमोदक :- मा. आशा सुर्यवंशी

संदर्भ :- मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र बप्र/पापु/३९१/१० दि. २०/१/२०१०

मा. प्रभाग अधिकारी, ब प्रभाग यांनी शिफारस केलेप्रमाणे-

ब प्रभागांतर्गत चिंचवडगांव वॉर्ड क्र. ६४ मधील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेतील लिकेजेस काढणे व किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. ९,९५,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर झाला.**

ठराव क्र. १७८ विषय क्र. ९
दिनांक :- १०/२/२०१० विभाग :- पाणीपुरवठा
सुचक :- मा. राजेंद्र साळुंके अनुमोदक :- मा. रघुनाथ वाघ

संदर्भ :- मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र बप्र/पापु/३९३/१० दि. २०/१/२०१०

मा. प्रभाग अधिकारी, ब प्रभाग यांनी शिफारस केलेप्रमाणे-

ब प्रभागातील प्रभाग क्र.५९, ६०, ६४, ६५ व ६६ या भागात खाजगी टँकरमार्फत पाणीपुरवठा करणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. ९,९५,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर झाला.**

ठराव क्र. १७९ विषय क्र. १०
दिनांक :- १०/२/२०१० विभाग :- पाणीपुरवठा
सुचक :- मा. रघुनाथ वाघ अनुमोदक :- मा. आशा सुर्यवंशी

संदर्भ :- मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र बप्र/पापु/४१९/१० दि. १०/२/२०१०

मा. प्रभाग अधिकारी, ब प्रभाग यांनी शिफारस केलेप्रमाणे-

ब प्रभागांतर्गत चिंचवडेनगर, बिजलीनगर इ. परिसरात पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेमधील किरकोळ देखभाल दुरुस्तीची कामे करणेकामी येणा-या अपेक्षित खर्च र.रु. ९,७५,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर झाला.**

ठराव क्र. १८० विषय क्र. ११
दिनांक :- १०/२/२०१० विभाग :- सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :- मा. राजेंद्र साळुंके अनुमोदक :- मा. गणेश भोंडवे

संदर्भ :- मा. हरिभाऊ तिकोने, अध्यक्ष, ब प्रभाग समिती यांचेकडील पत्र दि. १०/२/२०१०

चिंचवड वॉर्ड क्र. ६५ केशवनगर मधील श्रीमान महासाधू मोरया गोसावी क्रिडांगणामधील इमारतीचे गॅलरीतील दोन्ही जिन्यामध्ये लोखंडी जाळीचे ग्रील नसल्यामुळे त्याठिकाणी अस्वच्छता होत आहे. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने जाळी बसविणे अत्यावश्यक आहे.

तरी सदर ठिकाणी दोन्ही जिन्यांमध्ये लोखंडी जाळीचे ग्रील बसविणेकामी येणा-या अंदाजे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर झाला.**

ठराव क्र. १८१ विषय क्र. १२
दिनांक :- १०/२/२०१० विभाग :- सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :- मा. राजेश पिल्ले अनुमोदक :- मा. आशा सुर्यवंशी

संदर्भ :- सन्मा. नगरसदस्य राजेश पिल्ले यांचेकडील पत्र दि. १०/२/२०१०

अजमेरा वॉर्ड क्र. २९ येथील मोकळया जागेत, सांस्कृतिक केंद्र बांधणचे कामाकरीता सन २०१०-११ च्या अंदाजपत्रकात र.रु. ५०,००,०००/- वाढीव तरतुद करणेसाठी विचार करणेकामी मा. आयुक्त सो. यांचेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही करणेत यावी .

**ठराव सर्वानुमते मंजुर झाला.**

ठराव क्र. १८२ विषय क्र. १३
दिनांक :- १०/२/२०१० विभाग :- सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :- मा. गणेश भोंडवे अनुमोदक :- मा. आशा सुर्यवंशी

संदर्भ :- सन्मा. नगरसदस्य गणेश भोंडवे यांचेकडील पत्र दि. १०/२/२०१०

प्र.क्र. ५८ रावेत पुनावळे मधील खाली नमुद केलेल्या कामकाजासाठी सन २०१०-११ च्या अंदाजपत्रकात वाढीव तरतुद करणेसाठी विचार करणेकामी मा. आयुक्त सो. यांचेकडे शिफारस करणेत येत आहे.

| **अ.क्र.** | **कामाचे नांव** | **सन २०१०-११ साठी करावयाची तरतुद** |
|---|---|---|
| १. | रावेत पुनावळे येथील रस्ते खडीमुरुमाचे करणे. | ५० लाख |
| २ | रावेत पुनावळे येथील रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे. | १०० लाख |
| ३ | रावेत पुनावळे भागात गटर्स करणे | ५० लाख |
| ४ | मौजे रावेत येथे बेंगलोर मुंबई बाहयवळण मार्गावर उड्डाण पुल / भुयारी मार्ग बांधणे. | १०० लाख |

सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही सुरु करणेत यावी.

**ठराव सर्वानुमते मंजुर झाला.**

ठराव क्र. १८३ विषय क्र. १४
दिनांक :- १०/२/२०१० विभाग :- सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :- मा. राजेंद्र साळुंके अनुमोदक :- मा. रघुनाथ वाघ

संदर्भ :- सन्मा. नगरसदस्य राजेंद्र साळुंके यांचेकडील पत्र दि. १०/२/२०१०

प्र.क्र. ५९ वाल्हेकरवाडी मध्ये खाली नमुद केलेल्या विदयुत विषयक कामकाजासाठी सन २०१०-११ च्या अंदाजपत्रकात वाढीव तरतुद करणेसाठी विचार करणेकामी मा. आयुक्त सो. यांचेकडे शिफारस करणेत येत आहे .

| **अ.क्र.** | **कामाचे नांव** | **सन २०१०-११ साठी करावयाची तरतुद** |
|---|---|---|
| १. | बिजलीनगर येथील आर.एस. सेंटर पासून ते आहेरनगर भागात इमारती जवळून जाणारे धोकादायक उच्चदाब वाहीनी हलविणे. | १ कोटी |
| २ | स्वप्ननगरी, प्रेरणा शाळा इ. ठिकाणी म.रा.वि.वि. कं. चे लघुदाब व उच्चदाब वाहीनीचे पोल व तारा हलविणे. | १ कोटी |
| ३ | बिजलीनगर पाण्याच्या टाकी मागील परिसरामधील रस्ता रुंदीकरणात अडथळा निर्माण करणारे म.रा.वि.वि. कं. चे लघुदाब व उच्चदाब वाहीनीचे पोल व तारा हलविणे. | ५० लाख |
| ४ | वाल्हेकरवाडीमधील सो.व्हे. दिव्यांचे नुतनीकरण करणे व आवश्यक त्या ठिकाणी सो. व्हे. दिवे बसविणे व रोहीत्र संच बसविणे. | ५० लाख |

सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही सुरु करणेत यावी.

**ठराव सर्वानुमते मंजुर झाला.**

ठराव क्र. १८४ विषय क्र. १५

दिनांक :- १०/२/२०१० विभाग :- सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक :- मा. राजेंद्र साळुंके अनुमोदक :- मा. रघुनाथ वाघ

संदर्भ :- सन्मा. नगरसदस्य राजेंद्र साळुंके यांचेकडील पत्र दि. १०/२/२०१०

प्र.क्र. ५९ वाल्हेकरवाडी मध्ये खाली नमुद केलेल्या स्थापत्य विषयक कामकाजासाठी सन २०१०-११ च्या अंदाजपत्रकात वाढीव तरतुद करणेसाठी विचार करणेकामी मा.आयुक्त साो. यांचेकडे शिफारस करणेत येत आहे .

| **अ.क्र.** | **कामाचे नांव** | **सन २०१०-११ साठी करावयाची तरतुद अंदाजे रक्कम लाखात** |
|---|---|---|
| १. | वाल्हेकरवाडी येथे पवना नदीकाठी घाट बांधणे. | ४५ .०० |
| २ | चिंचवड जुना जकातनाका ते वाल्हेकरवाडी पर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करणे व अनुषंगिक कामे करणे. | १००.०० |
| ३ | वाल्हेकरवाडी ते रावेत रस्त्यांचे रुंदीकरण करुन डांबरीकरण करणे. | ४५.०० |
| ४ | आहेरनगर, सायली कॉम्प्लेक्स, चिंचवडे कॉलनी भोंडवेवस्ती परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | ५०.०० |
| ५ | गुरुद्वारा परिसरातील उर्वरित रस्ते डांबरीकरण करणे. | ५०.०० |
| ६ | विवेकानंद कॉलनी भागातील व इतर परिसरातील रस्ते खडीमुरुमाचे व बी बी एम करणे. | ४५.०० |
| ७ | गुरुद्वारा परिसरातील रस्त्याचे कडेने पेव्हींग ब्लॉक सरफेस गटर करणे. | ४५.०० |
| ८ | वाल्हेकरवाडीमधील मोकळया जागा विकसित करणे. | ५०.०० |
| ९ | वाल्हेकरवडी येथील स्मशानभुमी परिसर विकसित करणे. | १००.०० |
| १० | वाल्हेकरवाडी परिसरातील रस्त्याचे कडेने पेव्हींग ब्लॉक सरफेस गटर करणे. | ५०.०० |

तसेच खाली नमुद केलेल्या चालू कामांकरीता सन २०१०-११ चे अंदाजपत्रकात तरतुद करणेसाठी विचार करणेकामी मा. आयुक्त साो. यांचेकडे शिफारस करणेत येत आहे.

| **अ.क्र.** | **कामाचे नांव** | **सन २०१०-११ साठी करावयाची तरतुद अंदाजे रक्कम लाखात** |
|---|---|---|
| १. | वाल्हेकरवाडी मधील स्वप्ननगरी सोसा. व चर्च परिसरातील रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे. | ९०.०० |
| २ | गुरुद्वारा ते वाल्हेकरवाडी २४ मी. रुंद रस्त्याचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे. | ११०.०० |

सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही सुरु करणेत यावी.

**ठराव सर्वानुमते मंजुर झाला.**

ठराव क्र. १८५ विषय क्र. १६
दिनांक :- १०/२/२०१० विभाग :- सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :- मा. रघुनाथ वाघ अनुमोदक :- मा. गणेश भोंडवे

संदर्भ :- सन्मा. नगरसदस्य रघुनाथ वाघ यांचेकडील पत्र दि. १०/२/२०१०

प्र.क्र. ६० चिंचवडेनगर मध्ये खाली नमुद केलेल्या स्थापत्य विषयक कामकाजासाठी सन २०१०-११ च्या अंदाजपत्रकात वाढीव तरतुद करणेसाठी विचार करणेकामी मा. आयुक्त सो. यांचेकडे शिफारस करणेत येत आहे .

| **अ.क्र.** | **कामाचे नांव** | **सन २०१०-११ साठी करावयाची तरतुद अंदाजे रक्कम** |
|---|---|---|
| १. | थेरगांव पुल ते चिंचवडेनगर कॉर्नर पर्यंतचा डी.पी. नुसार रस्ता करणे. | १.०० कोटी |
| २ | चिंचवडेनगर येथील हॉटेल लोनावळा जंक्शन ते पवनानदीपर्यंत नाला बांधणे. | १.०० कोटी |
| ३ | चिंचवडे फॉर्म ते हॉटेल रानमळा पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ७५ लाख |
| ४ | चिंचवडेनगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | ५० लाख |
| ५ | शिवनगरी, बळवंतनगरी मधील रस्ते डांबरीकरण करणे. | ५० लाख |
| ६ | चिंचवडेनगर मधील शिवतेज कॉलनी व इतर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | ५० लाख |

सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही सुरु करणेत यावी.

**ठराव सर्वानुमते मंजुर झाला.**

**तसेच प्रस्तुत मिटींगमध्ये सन्मा. नगरसदस्य राजेश पिल्ले, मा. राजेंद्र साळुंके यांनी ब प्रभागाचे अंदाजपत्रकाबाबत स्थापत्य व विदयुत विभागाचे संबंधित अधिकारी यांचेशी विस्तृतपणे सविस्तर चर्चा केली.** वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. अध्यक्ष हरिभाऊ तिकोने यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

**सही/-**
**[ तिकोने हरिभाऊ किसन ]**
**अध्यक्ष**
**ब प्रभाग समिती, चिंचवड**

प्रति,
सर्व संबंधित

**प्रशासन अधिकारी**
**सभाशाखा, ब प्रभाग समिती**
**पिं.चिं. मनपा, चिंचवड-३३**

क्र. एएमसी/बप्र२/कावि/११०/२०१०
दि. ४/३ /२०१०

**F:\b ward meet ०९-१०\proced feb.२०१०.doc**